महाराष्ट्र शासन
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायालय, पुणे.

* * * * * * * * *

जहिरात

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे अंतर्गत
लेखापाल (Accountant) एक पदाकरीता कंत्राटी तत्वावर ११ महिन्याकरीता भरावयाची आहे.

ई–मेल आयडी – pune-dlsa.mh@bhc.gov.in
दुरध्वनी क्र. ०२० २५५३४८८१, भ्रमणध्वनी क्र. ८५९१९०३६१२

* * * * * * * * *

पदाचे नाव व पात्रता

अ.क्र	पदाचे नाव	संख्या	शैक्षणिक पात्रता(कमीत कमी)	एकत्रीत वेतन (दरमहा रूपये)
१.	**लेखापाल** (Accountant)	१	१) महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त वाणिज्य पदवी किंवा त्यापेक्षा उच्च शिक्षण. 2) महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त संस्थेतून टंकलेखन मराठी ३० श.प्र.मि. आणि इंग्रजी ४० श. प्र. मि किंवा त्यापेक्षा उच्चशिक्षण. ३) महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त स्थेतून एमएस–सीआयटी किंवा किंवा त्यापेक्षा उच्च शिक्षण.	रू. ३५,०००/–

<u>अटी व शर्ती</u>

१. लेखापाल पद हे निव्वळ तात्पुरत्या स्वरूपाचे असून फक्त ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी स्वरूपात भरण्यात येणार आहेत. उमेदवाराचा या पदावर नोकरीत कायम करणे बाबत कोणत्याही प्रकारचा हक्क वा अधिकार राहणार नाही.

२. या सोबत अर्जाचा नमुना दिलेला असून त्यापध्दतीचा अर्ज अर्जदाराने भरून **दिनांक १०/११/२०२५ सायं. ५:०० वाजे पर्यंत** नोंदणीकृत डाकेने किंवा हस्तदेयद्वारे खालील पत्यावर पोहचतील अशा प्रकारे दाखल करावा. त्यानंतर आलेल्या अर्जाचा कोणत्याही प्रकारे विचार केला जाणार नाही.

अर्ज दाखल करण्याचा पत्ता:

मा. सचिव,
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे
जिल्हा व सत्र न्यायालय,
नवीन इमारत, पहिला मजला, खोली क्र. १०७.
शिवाजीनगर, पुणे ४११ ००५.

३. सादर केलेल्या अर्जावर /पोस्टाच्या लिफाफ्यावर कोणत्या पदाकरीता अर्ज केला आहे ते स्पष्टपणे नमुद करावे. तसे नसल्यास अर्ज अपुर्ण समजुन त्याचा विचार केला जाणार नाही.

४. अर्जा सोबत शैक्षणिक पात्रतेबाबत स्वयंसाक्षांकित प्रती जोडणे अनिवार्य आहे.

५. निवड करण्यात आलेल्या उमेदवाराने प्राधिकरणाच्या अधिका—याकडे करारनामा लिहून द्यावा लागेल.

६. नेमणूकी नंतर उमेदवारास कोणतेही कारण न देता व कोणतीही पूर्व सुचना न देता नोकरीतून कमी करण्याचा अधिकार प्राधिकरणास राहील.

७. उमेदवारास नेमणूकीच्या कालावधीपुर्वी नोकरी सोडावयाची असल्यास दोन महिन्या पुर्वी पुर्व सुचना किंवा एक महिन्याचे एकत्रीत ढोबळ / स्थूल पगार या प्राधिकरणास जमा करावा लागेल.

पान क्र:३

8- एकत्रीत वेतन : मा. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांनी ठरवून दिल्याप्रमाणे दरमहा असेल.

९. वाणिज्य पदव्योत्तर पदवी तसेच तत्सम अधिक अर्हता धारकांना प्राधान्य देण्यात येईल.

10- उमेदवारानी मा. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण/ उच्च न्यायालय विधी सेवा समिती/ उपसमित्या/ जिल्हा विधी सेवा प्राधिकरण वा कोणत्याही न्यायालय किंवा न्यायाधिकरणात अधिकारी म्हणून काम केले असल्यास किमान **२ वर्षाचा** कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

किंवा

उमेदवाराला इतर कोणत्याही संस्थेत लेखापल म्हणून **३ वर्षाचा** कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

११. उमेदवाराला संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक आहे त्यात अकाउटिंग, सॉफटवेअर्स आणि कॅम्प्युटर प्रोग्राम्स मायक्रोसाफट ऑफिस, टॅली चे ज्ञान असणे आवश्यक आहे.

१२. मुलाखतीची तारीख उमेदवारांनी प्रदान केल्यानुसार वैयक्तिकरित्या भ्रमणध्वनी किंवा मेल आयडीवर कळविण्यात येणार.

13- भरती प्रक्रीयेची पुढील माहिती जिल्हा न्यायालय, पुणे यांच्या अधिकृत वेब साईट **pune.dcourts.gov.in** या संकेतस्थळावर वर तसेच सुचना फलकवार लावण्यात /प्रसिध्द करण्यात येईल.

(सोनल एस. पाटील)
सचिव,
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,पुणे.

स्थळ :— पुणे
दिनांक :— ३१/१०/२०२५

सत्यमेव जयते

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे.

* * * * * * * * *

कार्यालयीन उपयोगाकरीता

नोंदणी क्र :......../२०२५

नुकतेच काढलेले फोटो

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे अंतर्गत
लेखापाल (Accountant)
एक पदाकरीता निवळ तात्पुरत्या स्वरूपात ११ महिन्याकरीता पदभरती

अर्जाचा नमुना

1- अर्ज करण्यात येणा—या पदाचे नाव : **लेखापाल (कंत्राटी)**

२. अर्जदाराचे नाव :
....

३. वडील / पती चे नाव :
....

४. पुर्ण पत्ता :
....

....

५. आधार कार्ड क्रमांक :
....

६. मोबाईल क्रमांक :
....

७. ई मेल आयडी :
....

८. जन्म दिनांक : ....

९. उमेदवाराचे जाहिरातीच्या दिवशीचे वय : ....

१०. शैक्षणिक अर्हता :

अ.क्र	शैक्षणिक अर्हता	विद्यापीठ	उत्तीर्ण वर्ष	टक्केवारी
१				
२				
३				
४				
५				
६				
७				
८				
९				
१०				

११. कामाचे अनुभव :

(अ) लेखापाल कामाचे अनुभव : आहे / नाही (खुण ✓ करावी)

(ब) असल्यास कार्यकाळ : ....

(क) संस्थेचे/कार्यालयाचे नाव :

....

पत्ता — ....

....

१२. सोबत संबधीत सर्व कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकीत प्रती जोडणे आवश्यक आहे.

:..

स्वाक्षरी

:..

अर्जदाराचे संपुर्ण नाव

ठिकाण :

दिनांक :...../ /२०२५

घोषणापत्र

मी याद्वारे घोषित करतो / करते की माझयाद्वारे दिलेली वरील माहिती योग्य व बरोबर आहे आणि जर त्यामध्ये काही चुकीचे आढळले तर माझे उमेदवारी रद्द केले जाउ शकते.

:..
स्वाक्षरी

:..
अर्जदाराचे संपुर्ण नाव

ठिकाण :

दिनांक :...../.... /२०२५